| Regarding preparation of estimates of Mechanical / Electrical components of Lift irrigation schemes. | उपसा सिंचन योजनेअंतर्गत यांत्रीकी व विद्यूत कामाची अंदाजपत्रके तयार करणेबाबत. |
|---|---|

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-०६०९/(३११/०९)/मोप्र-१

दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०१०

**संदर्भ** : १) शासन निर्णय क्र. संकीर्ण-०६०९/(३११/०९)/मोप्र-१, दि. २२ जून, २००९.

**प्रस्तावना :**

उपसा सिंचन योजनेची कामे करीत असताना शासनाच्या निर्दशनास आले आहे की योजनेची अंदाजपत्रके ब-याचदा स्थापत्य विभागामार्फत केली जातात व ती मंजूर करण्यापुर्वी यांत्रिकी किंवा विद्युत विभागाच्या कामाशी संबंधित तांत्रिक बाबींची छाननी वा त्यामध्ये बदल करुन स्थापत्य विभागाकडून अंदाजपत्रकास मंजुरी दिली जाते. यांत्रिकी व विद्युत विभागाची संबंधीत पूर्ण कार्यप्रकाराची खात्री झाली नसल्याने अशा बदलामुळे प्रत्यक्ष काम करताना अडचणी उपस्थित होतात. सदर बाब विचारात घेता उपरोक्त संदर्भ १ च्या शासन निर्णयान्वये उपसा सिंचन योजना कार्यान्वित करणे व योजनांचे आराखडे तयार करणे बाबत यापूर्वीच सूचना निर्गमित केल्या आहेत. या शासन निर्णयाशी सुसंगत उपसा सिंचन योजनेत यांत्रिकी व विद्युत कामांबाबतीत उपलब्ध असलेले तज्ञ व अनुभवी मनुष्यबळाचा पुरेपूर वापर व्हावा आणि उपसा सिंचन योजनेच्या कामात समन्वय व सुसूत्रता राहावी याकरिता खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**परिपत्रकः-**

उपसा सिंचन योजनेच्या अंदाजपत्रकात विद्युत तसेच यांत्रिकी कामांचा समावेश असतो. ही विशिष्ट प्रकारची कामे असल्याने या कामाची अंदाजपत्रके बनवताना त्या क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी अभियंत्याकडून बनवली जाणे आवश्यक आहे, तसे मनुष्यबळविद्युत व यांत्रिकी विभागाकडे उपलब्ध आहे, त्यामुळेअशा घटक भागाच्या कामाची अंदाजपत्रके त्या त्या संबंधित (विद्युत/यांत्रिकी) विभागामार्फतच तयार करण्यात यावीत. तद्नंतर ती संबंधित विद्युत / यांत्रिकी सक्षम प्राधिका-यांकडून मंजूर करुन प्रकल्प अधिका-यांकडे सादर करावीत. प्रकल्प अधिका-यांनी यांत्रिकी वा विद्युत कामांची अशी मंजूर अंदाजपत्रके व स्थापत्य अंदाजपत्रके एकत्र करुन त्यास सक्षम स्तरावर मान्यता देण्यात यावी. यांत्रिकी व विद्युत विभागाने केलेल्या अंदाजपत्रकात फेरफार वा बदल करण्यात येऊ नयेत. मंजूर अंदाजपत्रकात विद्युत व यांत्रिकी कामाच्या संदर्भात काही बदल वा सुधारणा करणे अपरिहार्य असल्यास अशा सुधारणा वा बदल स्थापत्य विभागाने संबंधित विद्युत / यांत्रिकी विभागाच्या निदर्शनास आणून संबंधित विद्युत / यांत्रिकी सक्षम स्तरावर मान्यता प्राप्त झाल्यानंतर स्थापत्य विभागाने त्याचा समावेश

करावा. त्याच बरोबर वरील संदर्भीय (१) निर्णयातील सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

सदरील शासन परिपत्रक शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्र. २०१०११०२१५४७१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दी. धों. भिडे)
मुख्य अभियंता (द.व प्र.) व सह सचिव

प्रत,
कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
कार्यकारी संचालक,महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे
मुख्य अभियंता,(विप्र), जलसंपदा विभाग, पुणे
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती
मुख्य अभियंता (विद्युत) जलविद्युत प्रकल्प, जलसंपदा विभाग, मुंबई
मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प, जलसंपदा विभाग, पुणे
मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद
मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश,मुंबई
मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाक्षेवि,जसंवि,औरंगाबाद
मुख्य अभियंता, ल.पा.(स्थानिकस्तर), पुणे.
मुख्य अभियंता (विप्र)जलसंपदा विभाग, अमरावती.
मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक
अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, (उ.सं.)पुणे/नागपूर/कोल्हापूर/नांदेड/द्वारे पुणे

प्रत, माहितीसाठी सादर
खाजगी सचिव, मा.मंत्री, जलसंपदा (कृखोविमं वगळून) मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा.मंत्री, (कृखोविमं ) मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव मा.राज्यमंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई-३२
मा.सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२
मा.सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२
सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
आंतरवित्त सल्लागार व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
सर्व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
मोप्र-१ कार्यासन संग्रहार्थ